**प्रेसनोट दि. २५.०१.२०२१**

श्री. सुरेश शिवमुर्ती रेड्डी, वय ४८ वर्ष, नगर भुमापन अधिकारी सांगली यांना ७५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडीलांनी तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे नावाने बक्षीसपत्राने मालमत्ता लिहुन दिलेली होती. सदर बक्षीस पत्राची सिटी सर्व्हे उताऱ्यावर नोंद घेवुन त्याचा सिटी सर्व्हे उतारा देणेकरीता श्री. सुरेश रेड्डी, नगर भुमापन अधिकारी, सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे एक लाख रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी आज दि.२५.०१.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक २५.०१.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. सुरेश रेड्डी, नगर भुमापन अधिकारी, सांगली यांनी बक्षीसपत्राची सिटी सर्व्हेस नोंद घेवुन सिटी सर्व्हे उतारा देणेकरीता एक लाख रूपये लाचेची मागणी करून ७५,०००/- रूपये घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, विजयनगर सांगली इमारतीमधील नगर भुमापन कार्यालय, सांगली या ठिकाणी सापळा लावला असता श्री. सुरेश शिवमुर्ती रेड्डी, वय ४८ वर्ष, नगर भुमापन अधिकारी सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ७५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. सुरेश शिवमुर्ती रेड्डी, वय ४८ वर्ष, नगर भुमापन अधिकारी सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, सुहेल मुल्ला, रविंद्र धुमाळ, संजय संकपाळ, संजय कलकुटगी, भास्कर भोरे, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, राधीका माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned with CamScanner